खाजगी विहिर/विंधन विहीर अधिग्रहणाबाबत शेतकऱ्यास देण्यात येणाऱ्या मोबदल्यामध्ये सुधारणा करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग
शासन निर्णय क्रमांकः टंचाई २०१८/प्र.क्र.१६७/पापु १४
जी. टी. रुग्णालय संकुल इमारत, ७ वा मजला,
मंत्रालय, मुंबई ४०० ००१
तारीख: ०८ मे, २०१९

<u>वाचा -</u>

१) दिनांक १५ एप्रिल, १९८३ चा महाराष्ट्र पिण्याचे पाणी पुरवठयाचे अधिग्रहण अधिनियम १९८३
२) शासन निर्णय, पा.पु. व स्व. वि., क्रमांकः टंचाई ३०९९/प्र.क्र.१३/पापु-१४, दिनांक १ फेब्रुवारी, १९९९.
३) शासन निर्णय, पा.पु. व स्व. वि., क्रमांकः टंचाई २०१८/प्र.क्र.१६७/पापु-१४, दिनांक ३० नोव्हेंबर, २०१८.
४) भारत निवडणूक आयोग यांचे पत्र क्र. ४३७/MT-IIP/२०१९/WS-II, दिनांक ०२.०५.२०१९
५) **महसूल व वन विभाग** (मदत व पुनर्वसन) यांचे पत्र क्र.एससीवाय २०१८/प्र.क्र.२५१/म-७, दिनांक ४ मे, २०१९.

<u>प्रस्तावना : -</u>

महाराष्ट्र पिण्याच्या पाणी पुरवठयाचे अधिग्रहण करण्याबाबत अधिनियम १९८३, दिनांक १५ एप्रिल, १९८३ रोजी प्रसिध्द करण्यात आलेला आहे. या अधिनियमातील कलम ३ मधील तरतुदीनुसार पाणी टंचाई कालावधीत राज्यातील ग्रामीण भागातील ग्रामस्थांच्या पिण्याच्या पाण्याची सोय करण्यासाठी विहिरी अथवा अन्य जलाशयातून पिण्याकरिता पाणी उपलब्ध करुन देण्याच्या दृष्टीने खाजगी मालकांचे जलसाठे लेखी आदेशाद्वारे अधिग्रहण करण्याचे अधिकार जिल्हाधिकारी अथवा जिल्हाधिका-यांनी प्राधिकृत केलेल्या अधिका-यास प्रदान करण्यात आलेले आहेत. या अधिनियमातील

कलम ८ (अ) व ८(ब) अन्वये खाजगी मालकांचे जलसाठे अधिग्रहीत करण्यात आल्यानंतर त्यांच्या मालकांना दयावयाचा मोबदला निश्चित करण्यात आलेला आहे.

महाराष्ट्र पिण्याच्या पाणी पुरवठयाचे अधिग्रहण अधिनियम, १९८३ मधील कलम-८ मध्ये सुधारणा करण्यात आली असून, सदर सुधारणेनुसार पिण्याच्या पाण्याची विहिर अधिग्रहीत केलेल्या विहिर मालकांना पाण्याचा मोबदला देण्याकरिता १९८३ च्या मूळ अधिनियमातील कलम ८ (अ) व ८(ब) अन्वये मोबदला देण्याची तरतूद अधिक्रमित करण्यात आली असून त्याऐवजी खाजगी मालक व प्राधिकृत अधिकारी यांनी मोबदल्यासंदर्भात करार करण्याची तरतूद करण्यात आली असून मोबदल्याच्या दराची कमाल मर्यादा राज्य शासनाने वेळोवेळी ठरवावयाची आहे.

पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, शासन निर्णय, दिनांक ३० नोव्हेंबर, २०१८ नुसार पाणी टंचाईच्या कालावधीत अधिग्रहीत केलेल्या विहीरीच्या मोबदल्याचे सुधारित दर मंजूर करण्यात आले आहेत. तथापि विहिरीतून पाणी उचलण्याच्या परिमाणानुसार खाजगी विहिर/विंधन विहिर मालकास देण्यात येणाऱ्या मोबदल्यामध्ये सुधारणा करण्यास बाब शासनाच्या विचाराधीन होती. या प्रस्तावास मा. मंत्री, मदत व पुनर्वसन यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक ०२.०५.२०१९ रोजी झालेल्या मंत्रीमंडळ उपसमितीच्या बैठकीत मान्यता देण्यात आली. त्यानुषंगाने शासन निर्णय निर्गमित करण्याची बाब विचाराधीन होती.

शासन निर्णय :-

पिण्याच्या पाण्याच्या टंचाई निवारणार्थ अधिग्रहीत केलेल्या विहीरीच्या मोबदल्याचे दर सुधारित करण्यात येत आहेत. त्यानुसार अधिग्रहीत पाण्याच्या स्त्रोतामधून टँकर भरण्यासाठी पुरविण्यात येणाऱ्या पाण्याकरिता रु. १२/- प्रति हजार लिटर असा दर विहीत करण्यास मंजूरी देण्यात येत आहे. तसेच या दराने होणारी रक्कम अथवा शासन निर्णय दिनांक ३०.११.२०१८ अन्वये सुधारित करण्यात आलेले विहीत दर रु. ४५०/- (पाणी उचलण्यासाठी साधन सामुग्री शिवाय) / रु. ६००/- (पाणी उचलण्यासाठी साधन सामुग्री सह) यामधील अधिकतम रक्कम खाजगी विंधन विहीर/साध्या विहीर धारकास अदा करण्यास मंजूरी देण्यात येत आहे.

२. प्रस्तुत शासन निर्णय हे मा. मंत्री, मदत व पुनर्वसन यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक ०२.०५.२०१९ रोजी झालेल्या मंत्रीमंडळ उपसमितीच्या बैठकीत घेण्यात आलेल्या निर्णयाच्या अनुषंगाने निर्गमित करण्यात येत आहे.

३. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०५०८१२०९४५४२२८ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Sham Lal Goyal

Digitally signed by Sham Lal Goyal
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Watersupply And Sanitation Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=fef8a156550c1999143688f755340a6b9d3ad380fcde16709e4e63210467e734, serialNumber=19d0cb2b5b2018974e0c848afbd781451d1c4c0d347d2a12395c8dffac4670f9, cn=Sham Lal Goyal
Date: 2019.05.08 12:52:05 +05'30'

(शाम लाल गोयल)
अपर मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा. मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई
२. मा.मंत्री, पाणी पुरवठा व स्वच्छता, मंत्रालय, मुंबई
३. मा. राज्यमत्री, पाणी पुरवठा व स्वच्छता, मंत्रालय, मुंबई
४. अपर मुख्य सचिव, (मदत व पुनर्वसन) महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई
५. प्रधान सचिव, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई
६. प्रधान सचिव (नवि-२), नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई
७. सचिव, ग्राम विकास विभाग, बांधकाम भवन, फोर्ट, मुंबई
८. विभागीय आयुक्त (सर्व)
९. सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, बेलापूर
१०. जिल्हाधिकारी (सर्व)
११. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, (सर्व)
१२. अधीक्षक अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण (सर्व)
१३. कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, जिल्हा परिषद (सर्व)
१४. कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण (सर्व)
१५. मुख्य लेखा परीक्षक, स्थानिक निधी लेखा (सर्व)
१६. जिल्हा स्थानिक निधी लेखा परीक्षक (सर्व)

१७. जिल्हा कोषागार अधिकारी (सर्व)
१८. महालेखाकार, (लेखा परीक्षा / लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र-१, मुंबई
१९. महालेखाकार, (लेखा परीक्षा / लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र-२, नागपूर
२०. अपर मुख्य सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, यांचे स्वीय सहायक
२१. उप सचिव (पापु १४), पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, यांचे स्वीय सहायक
२२. अवर सचिव (पापु १४), पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, मंत्रालय.
२३. पापु १४ (निवडनस्ती)